प्रति,    दिनांक :   .  .२०२०

माननीय मुख्याध्यापक/शिक्षणाधिकारी,

**विषय : प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचा होणारा अवमान रोखणे आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय प्रतिकांविषयी जागृती करणे यांविषयी ....**

महोदय,

राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राची अस्मिता ! मात्र दुर्दैवाने याचे स्मरण केवळ १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशीच बहुतांश भारतियांना होते अन् या दिनी राष्ट्रध्वज मोठ्या अभिमानाने मिरवले जातात. हेच कागदी/प्लास्टिकचे छोटे छोटे राष्ट्रध्वज त्याच दिवशी सायंकाळपासून रस्त्यावर, कचऱ्यात, गटारात आदी ठिकाणी पडलेले आढळतात. प्लास्टिकचे ध्वज तर लगेच नष्टही होत नाहीत, त्यामुळे अनेक दिवस या राष्ट्रध्वजांची विटंबना पाहावी लागते. राष्ट्रध्वजाची अशा प्रकारे होणारी विटंबना रोखण्यासाठी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका (१०३/२०११) दाखल केली होती. याविषयी सुनावणी करतांना न्यायालयाने प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाद्वारे होणारा अवमान रोखण्यासाठी शासनाला आदेश दिले आणि त्यानुसार केंद्रीय अन् राज्य गृह विभाग, तसेच शिक्षण विभाग यांनी याविषयीचे परिपत्रकही काढले.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या देशभक्तांनी इंग्रजांचे अत्याचार चालू असतांना हातातील राष्ट्रध्वज जमिनीवर पडू नये, यासाठी अनेक लाठ्या खाल्ल्या, अत्याचार सहन केले, राष्ट्रध्वजाची विटंबना होऊ नये, यासाठी क्रांतिकारकांनी प्रसंगी प्राणाचेही बलीदान दिले. असे असतांना लहान मुलांना खेळण्यासाठी, वाहनांवर लावण्यासाठी घेतलेले कागदी आणि प्लास्टिकचे झेंडे, रस्त्यावर आणि नंतर कचराकुंडीत पहायला मिळतात, पायदळी तुडवले जातात. यामुळे राष्ट्रध्वजासाठी बलीदान करणाऱ्या क्रांतिकारकांची आणि अत्याचार सहन करणाऱ्या देशभक्तांची क्रूर चेष्टाच केल्यासारखे आहे. तसेच काही जण तिरंग्याच्या रंगाप्रमाणे स्वतःचा चेहरा रंगवतात. काही जण राष्ट्रध्वजाच्या रंगातील कपडे घालून फिरतात, हेच कपडे मळतात, खराब होतात, यांमुळेही राष्ट्रध्वजाचा अवमानच होतो. अशा कृतींमुळे स्वातंत्र्यदिनीच राष्ट्रध्वजाचा घोर अवमान सर्रासपणे केला जात आहे. तरी राष्ट्रध्वजाचा अवमान वा विटंबना होईल, अशा कृती शाळेतील विद्यार्थ्यांकडून होऊ नयेत, यासाठी शाळांमधून प्रबोधन करणे अत्यावश्यक झाले आहे.

आजचे विद्यार्थी ही देशाची भावी पिढी ! ही भावी पिढी राष्ट्राभिमानी व्हावी, या उदात्त हेतूने समिती गेली १८ वर्षे ‘राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा !’ हा उपक्रम राबवत आहे. मुलांमध्ये राष्ट्रप्रेम अन् राष्ट्रभक्ती निर्माण व्हावी, राष्ट्रीय प्रतिकांविषयी आदर निर्माण व्हावा, यांसाठी ‘राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा !’ या विषयावर व्याख्याने आणि प्रश्नमंजुषा घेणे, राष्ट्रीय प्रतिकांचे महत्त्व सांगणारी पत्रके वाटणे, फ्लेक्स/होर्डिंग लावणे, रस्त्यावर पडलेले राष्ट्रध्वज गोळा करणे, प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाची विक्री रोखण्यासाठी प्रयत्न करणे आदी उपक्रम राबवत आहे. तरी हे उपक्रम आपल्या शाळेत घेण्यास आम्हाला अनुमती मिळावी, ही विनंती.

आपला विश्वासू,